महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

२५ नग लोखंडी ट्रंका कुलुप किल्लीसह पुरविण्यासंदर्भात.

सन-२०२६ च्या हिवाळी अधिवेशनाकरिता या सचिवालयातील अतिमहत्वाचे अभिलेखे विधान भवन, नागपूर येथे ने-आण करण्याकरिता २९"X१६"X१०" या आकारमानाच्या २५ नग लोखंडी ट्रंक कुलुप किल्लीसह पुरविण्याकरिता या क्षेत्रातील पुरवठदार/ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२९"X१६"X१०" या आकारमानाच्या लोखंडी ट्रंकाचे दरपत्रक भरण्यापूर्वी कक्ष अधिकारी, ग-२ शाखा, कक्ष क्रं.०१७ तळमजला, विधान भवन, मुंबई यांचेकडून या सचिवालयास आवश्यक असलेल्या ट्रंकेचा नमूना बघून GST सह दर नमूद करुन दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक २६ ऑक्टोंबर, २०२६ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

सचिव-४,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.